सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर
चतुरस्र परखड रास्त कर्तव्यदक्ष
# चपराक
पुणे
मूल्य ३₹
संपादक : घनश्याम पाटील
वर्ष : ६ अंक : ०६ पाने : ०४
www.chaprak.com
■ सोमवार, दि. २२ ते २८ फेब्रुवारी २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016
Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 22/02/2016

KaMant masale
एकदा वापरून पहाच!
किंग ऑफ टेस्ट
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरुमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com Web : www.kamantmasale.com

# क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
**परिवर्तन आघाडी**

**संपादकीय**
घनश्याम पाटील - ७०५७२९२०९२

*महाराष्ट्र* साहित्य परिषद ही साहित्यातील मातृसंस्था आहे. लोकमान्य टिळकांच्या कल्पनेतून साकारलेल्या या संस्थेचे नेतृत्व अनेक दिग्गजांनी केले. मात्र गेल्या काही वर्षात या संस्थेची रयाच गेली. वादविवाद आणि वितंडवाद यामुळे साहित्य परिषद चर्चेत येतेय. साहित्य परिषदेतून साहित्यच हरवलेय असे वाटते. आजीव सभासदांचाही परिषदेशी फारसा संबंध राहिलेला नाही. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे परिषदेचे मुखपत्र असलेले त्रैमासिक आणि पंचवार्षिक निवडणुकीच्या वेळी आलीच तर मतपत्रिका, एवढाच काय तो आजीव सभासदांचा परिषदेशी संबंध येतोय.

मात्र यंदा चित्र बदलतेय. अतिशय परखड बाण्याचे, प्रामाणिक आणि शिस्तप्रिय निवडणूक निर्णय अधिकारी लाभल्याने त्यांनी अनेक विधायक, सकारात्मक बदल घडविले आहेत. निवडणूक प्रक्रियेत त्यांनी केलेले आमुलाग्र बदल स्वागतार्ह आहेत. त्यामुळे यापूर्वी मतदान प्रक्रियेतील गैरव्यवहाराबाबत जी उलटसुलट चर्चा व्हायची त्याला चाप बसला. एकतर त्यांनी यावेळी प्रत्येक मतपत्रिकेला सांकेतिक क्रमांक (बारकोड) दिले आहेत. शिवाय मतदारांचे ओळखपत्र अनिवार्य केल्याने या प्रक्रियेत पारदर्शकता दिसून येते. त्यामुळे आमच्यासारख्या काहींनी या व्यवस्थेचे आणि प्रक्रियेचे जोरदार स्वागत केले आहे तर काहींच्या पायाखालची वाळू सरकली.

पत्रकार या नात्याने आम्ही आजवर अनेक निवडणुका अनुभवल्या. मात्र प्रत्यक्ष निवडणुकीला सामोरे जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. हा अनुभव खूप काही शिकवून जाणारा, समृद्ध करणारा आहे. परिषदेतील अपप्रवृत्तींवर बाहेरून अनेकवेळा मी धाडसाने दगडफेक केली; मात्र त्याचा फारसा काही परिणाम झाल्याचे दिसले नाही. त्यामुळे स्वतः परिषदेत उतरून आपण काहीतरी करावे या विचाराने मी निवडणुकीच्या मैदानात उतरलो. विविध क्षेत्रातील समाजद्रोह्यांना कायम 'चपराक' देताना आम्ही कधीही डगमगलो नाही. त्यामुळेच 'तुमच्यासारखे साहित्यिक कार्यकर्ते परिषदेत हवेत' असे अनेक मान्यवर आवर्जुन सांगत आहेत. सभासदांचा मिळणारा हा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. त्यांच्याकडून मिळणारी कौतुकाची थाप ही मोठी पावती होय.

निवडणुकीच्या निमित्ताने अनेक बरेवाईट अनुभव येत असून त्यावर आधारित 'जावे त्याच्या वंशा' हे पुस्तक मी लवकरच आपणास वाचावयास देईन! साहित्य परिषद साहित्याभिमुख व्हावी, समाजाभिमुख व्हावी यासाठी आमच्या 'परिवर्तन आघाडी'चे प्रमुख प्रा. मिलिंद जोशी, प्रकाश पायगुडे आणि सुनिताराजे पवार प्रयत्नशील आहेत. त्यामुळेच त्यांनी साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या उमेदवारांचाच या आघाडीत समावेश केला. समोरच्या पॅनलने एकाही महिलेला स्थान दिले नसताना 'परिवर्तन'ने मात्र बारा जागांपैकी चार ठिकाणी महिला उमेदवारांना संधी देऊन साहित्य क्षेत्रातील स्त्री शक्तीचा सन्मान केला आहे. 'पुरूषी मानसिकतेतून मला त्रास दिला जातो आणि माझी कुचंबणा होते' असे गळे काढणारी विदुषी मात्र खुल्या दिलाने या निर्णयाचे स्वागत करत नाही!

साहित्य परिषदेचे ११३०० मतदार आहेत. त्यात पुण्यातील २८६५ जणांचा समावेश आहे. परिषदेने उमेदवारांना या सभासदांची जी यादी दिली त्यात कुणाचेही संपर्क क्रमांक किंवा मेल आयडी नाहीत. त्यामुळे संपर्कात अनंत अडचणी येत आहेत. त्यातील कित्येक सभासद हयात नाहीत, काहींची नावे दुबार आहेत तर काहींचे पत्ते बदलले आहेत. त्यामुळे उमेदवारांच्या वेळेचा आणि पैशाचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होतोय. शिवाय या यादीत सर्वांची नावे आद्याक्षराप्रमाणे असल्याने त्या त्या भागातील सभासदांची यादी वेगळी करणे हे जिकिरीचे काम आहे. वेळेच्या मर्यादा लक्षात घेता यातील सभासदांपर्यंत थेट पोहोचणे कुणालाही शक्य होत नाही. त्यामुळे पत्रव्यवहाराला पर्याय नाही. त्यातही पत्ते किंवा पिन कोड क्रमांक चुकीचे असतील तर पत्रं त्यांच्यापर्यंत जात नाहीत. या साऱ्या अडचणींवर मात करण्याचे आव्हान दोन्ही पॅनलपुढे आहे.

व्यक्तीशः मला या निवडणुकीत प्रचंड प्रतिसाद मिळतोय. मतदारांच्या घरी गेल्यानंतर ते जोरदार स्वागत करतात. साहित्यावर चर्चा होते. त्यांची ग्रंथसंपदा कळते. माणसाच्या वृत्ती-प्रवृत्ती कळतात. अनेक सभासद गेल्यानंतर आधी 'चपराक'ची वर्गणी हातात टेकवतात. ते सांगतात, ''आम्ही परिवर्तन आघाडीला मत तर देणार आहोतच, पण आधी 'चपराक'च्या अंकाची वर्गणी घ्या! तुमचा अंक आमच्यापर्यंत आलाच पाहिजे...'' हा प्रतिसाद उमेद वाढवणारा आहे. लोकांना परिवर्तन हवेय. साहित्य परिषद साहित्यिक उपक्रमांनी चर्चेत यावी, या मातृसंस्थेची अप्रतिष्ठा होऊ नये असेच अनेकांना वाटते.

अर्थात, काही कटू अनुभवही आहेत पण ते मोजकेच! एका नामवंत लेखकाने विचारले, ''तुम्हाला व्हर्च्युअल रिअॅलिटी माहिती आहे का?'' मी त्यांना म्हणालो, ''हो, म्हणजे भासात्मक सत्य!''

त्यांनी सांगितले, ''अगदी बरोबर! आता एक भासात्मक सत्य मनावर बिंबवा की, मागील वर्षभर मी तुमच्याकडे लेखन केले आहे. त्याचे मानधन आणून द्या आणि आमची इतकी मते घेऊन जा!''

लेखन केलेले नसतानाही असे मानधन मागणे हा केवढा मोठा गैरव्यवहार! राजकारण्यांना लाजवेल असा हा अनुभव! त्यामुळे आम्ही त्यांना स्पष्ट शब्दात नकार दिला आणि बाहेर पडलो.

काहीजण घरी बोलवून प्रेमाने पाच-दहा कविता ऐकवतात आणि मत आमच्याच परिवर्तन पॅनलला देणार असल्याचे सांगतात. लेखणी-वाणीवर जबरदस्त प्रभूत्व असलेले प्रा. मिलिंद जोशी हे महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. प्रकाश पायगुडे यांनी परिषदेच्या माध्यमातून यापूर्वी चांगले कार्य केले आहे. सुनिताराजे पवार या 'संस्कृती प्रकाशन'च्या माध्यमातून साहित्य शारदेची उपासना करतात. ज्योत्स्ना चांदगुडे या 'साहित्यदीप प्रतिष्ठान'च्या अध्यक्षा आहेत. निलिमा बोरवणकर यांची सकस ग्रंथसंपदा आहे. स्वप्निल पोरे हे 'केसरी'चे वृत्तसंपादक आहेत, उत्तम कवी आणि कथाकार आहेत. चित्रपटविषयक लेखनात त्यांचा हातखंडा आहे. वि. दा. पिंगळे हे शिक्षक आहेत, कवी आहेत. त्यांची बिनविरोध निवड झाली. मी 'चपराक'च्या माध्यमातून गेली चौदा वर्षे साहित्य क्षेत्रात कार्यरत आहे. नंदा सुर्वे गेली अनेक वर्षे परिषदेवर कार्यरत आहेत. प्रा. क्षितिज पाटुकले हे उत्तम लेखक असून दत्तोपासक आहेत. त्यांच्या 'कर्दळीवन' या पुस्तकाने इतिहास रचला. श्रीधर कसबेकर हे विधिज्ञ आहेत. असा हा भक्कम संघ परिषदेच्या विकासासाठी, मराठीच्या संवर्धनासाठी मैदानात उतरलाय. त्यामुळे त्याला बळकटी देणे हे सुजाण मतदारांचे कर्तव्य आहे.

आमच्यासारख्या तरूणांनी या निवडणुकीत भाग घेतल्याने साहित्य परिषदेचे वय कमी झाले आहे. प्रा. मिलिंद जोशी हे सर्वात कमी वयाचे कार्याध्यक्ष होतील. हा विक्रम नोंदविला गेला तर साहजिकच परिषदेशी तरूणांचे नाते अधिक घट्ट होईल. ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि तरूणांची खंबीर साथ या बळावरच हा मराठीचा गाडा हाकावा लागेल. त्यासाठी आता परिवर्तन घडवा. कोणतेही किंतु मनात न ठेवता आमच्या आघाडीचे हात मजबूत करा. मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, समीक्षा, संशोधन यासाठी हे पूरक आणि पोषक ठरणार आहे. केवळ मराठी भाषा दिन साजरा करणे, मराठी सप्ताह साजरा करणे यामुळे फारसे काही होणार नाही. 'क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे' हे सूत्र लक्षात घ्यायला हवे. आम्हाला चांगली कृती करायचीय. त्यासाठी आपणा सर्वांचा पाठिंबा मिळावा, इतकेच या निमित्ताने सांगावेसे वाटते. बाकी या साऱ्या प्रक्रियेविषयी लवकरच एक पुस्तक लिहून साहित्य क्षेत्राचा चेहरा लख्खपणे दाखवतोय. तूर्तास, परिवर्तनाच्या प्रतिक्षेत!

'चपराक प्रकाशन'ची दर्जेदार ग्रंथसंपदा

कोंबडं झाकणाऱ्या म्हातारीची गोष्ट (प्रतिवाद) । **भाऊ तोरसेकर** । १५०
दखलपात्र (अग्रलेख संग्रह) । **घनश्याम पाटील** । १५०
झुळूक आणि झळा (अग्रलेख संग्रह) । **घनश्याम पाटील** । १५०
कॉलेज गेट (कादंबरी) । **सागर कळसाईत** । २४४
एमरल्ड ग्रीन (कथासंग्रह) । **समीर नेर्लेकर** । ७५
विज्ञानमूर्ती ज्ञानोबा तुकोबा (आध्यात्मिक) । **दत्तात्रेय गायकवाड** । १३०
थोडं मनातलं (लेख संग्रह) । **विनोद श्रा. पंचभाई** । १२०
ओविली फुले मोकळी (ललित संग्रह) । **सदानंद भणगे** । १५०
गंध माणसांचा (व्यक्तिचित्रण) । **संजय वाघ** । १३०
एकनाथजी रानडे (चरित्र) । **सागर सुरवसे** । ७५
दगडखाणीतील उद्ध्वस्त आयुष्य (कादंबरी) । **हणमंत कुराडे**। ७५
भाषेचं मूळ (भाषाशास्त्र) । **संजय सोनवणी** । ११०
लोकनायक सयाजीराव गायकवाड (चरित्र) । **सौ. चंद्रलेखा बेलसरे** । ७०
बाळासाहेब एक अंगार (चरित्र) । **नागेश शेवाळकर** । १७५

या पुस्तकांसाठी संपर्क : ०२० २४४६०९०९, ७०५७२९२०९२

सुवर्णाक्षरे



**सुवर्णा जाधव,** मुंबई
९८१९६२६६४७

# मोगरा फुलला

*मोगरा* म्हटलं की प्रसन्न पांढरा शुभ्र सुवासिक मोगरा डोळ्यासमोर उभा राहतो आणि प्रसन्न, छान वाटतं. शब्दांचंही नशीब असावं... म्हणूनच गटार शब्द म्हटलं की सगळे नाक मुरडतात. कारण त्या शब्दाने आपल्यासमोर गटाराची प्रतिमा, चित्र डोळ्यासमोर उभं राहतं आणि अस्वच्छता, घाण, दुर्गंध या साऱ्या गोष्टी मूर्तिमंत डोळ्यासमोर उभ्या राहतात आणि आपण जेवत असू आणि चुकून माकून विषय गटारावर येऊन ठेपला की आपण म्हणतो, 'काय हे जेवताना तरी चांगले विषय काढत चला.' शब्दासारखा तो एक शब्द... पण गटार या अस्वच्छ बाबीशी जोडला गेला असल्याने गटाराप्रमाणेच 'गटार' शब्दही नकोसा वाटतो.

तसं मोगऱ्याचं नाही. मोगरा शब्दाचं नशीब थोर. मोगरा म्हटलं की डोळ्यासमोर उभी राहतात. ती पांढरीशुभ्र... टपोरी टवटवीत सुवास दरवळत ठेवणारी... मन प्रसन्न करणारी... वातावरण प्रसन्न करणारी फुले... मोगऱ्याच्या फुलाने प्रसन्न, टवटवीत वाटतंच पण 'मोगरा' शब्द उच्चारला तरी तशीच प्रसन्नता वाटते.

काही शब्दांशी, वस्तुंशी आपल्या आठवणी निगडीत असतात. ते शब्द उच्चारले... त्या वस्तू समोर आल्या की 'त्या' आठवणींना उजाळा मिळतो आणि आपण फ्लॅशबॅक मध्ये जातो.

मलाही मोगरा म्हटलं की एक गाणं आठवतं-

**ती येते आणिक जाते**
**येताना कळ्या आणिते**
**जाताना फुले आणिते...**

रंजू... मला मोगरा म्हटला की तिच आठवते... मला मोगरा खूप खूप आवडतो. केसात माळायला हवाच पण घरातील एका डीशमध्ये मोगरा भरुन टेबलावर ठेवला की सगळं घर दरवळतं आणि घर ही प्रसन्न वाटतं. माझी ही आवड पाहून रंजू मला रोज सकाळी मोगऱ्याच्या कळ्या देवून जायची आणि दरवळ मागे सोडून जायची. तिच्या येण्याची आणि तिच्या मोगऱ्याची मला सवयच होऊन गेली. एखादे दिवशी ती नाही आली तर बेचैन वाटायचं कारण तीही नसायची आणि दरवळही!

एखाद्या फुलवेड्या स्त्रीला मोगऱ्याचा गजरा दिला तर तिच्या चेहऱ्यावरचा आनंदही अगदी पाहण्यासारखा असतो आणि असा आनंदही घ्यायला मला आवडतो.

रंजू एक आठवडा आलीच नाही. मलाच सुकल्यासारखं वाटायला लागलं. रंजूच्या आगमनाने फुलणारी मी ती न आल्यामुळे सुकल्यासारखी झाले. एका आठवड्याने रंजूची आई आली... खूप सारी मोगऱ्याची फुले घेवून! मोगऱ्याच्या वासानंच मोहरणारी... फुलणारी मी त्या दिवशी इतकी फुलं पाहूनही फुलले नाही कारण रंजू आली नव्हती ना! मग तिच्या आईलाच विचारलं, ''काय मावशी रंजू कुठंय? रंजूच्या येण्याचं आणि तिच्या मोगऱ्याची मला सवयच नव्हे तर अगदी व्यसन लागल्यासारखं झालंय पहा. ती कधी येणार? काय झालं तिला? मी येवू का तिला भेटायला तुमच्या घरी...'' त्यावर मावशी... रंजूची आई म्हणाल्या, ''अगं प्रश्नांची किती सरबत्ती करशील? तसं काळजीचे कारण नाही. जरा तिचं मन कुठं लागत नाही... जरा अस्वस्थ आहे... चलबिचल चालू आहे.''

मला थोडं वेगळंच वाटलं. काही विचारावं की नाही अशा द्विधा मनस्थितीत मी होते. तरी काळजी,



उत्सुकता, रंजू प्रती असलेली माया मला गप्प बसू देईना. शेवटी धाडस करुन विचारलच... ''मावशी मला जरा सविस्तर सांगाल का? मग मी तिची समजूत घालू शकेल, तिला भेटेन'' त्यावर दीर्घ उसासा टाकत मावशी सांगू लागल्या-

''काय सांगावी तिची कर्मकथा. पहिलंच स्थळ पाटलाचं चालून आलं म्हणून आम्हाला वाटलं पोरीचं भाग्य लई चांगलं. मग दिला तिच्या लग्नाचा बार उडवून. माझी मुलगी शिकलेली... १२ वी पास पण शिक्षणच आडवं आलं. पाटलाचं घर परंपरावादी... मग हळूहळू त्यांना रंजूचं राहणं... बोलणं... डोक्यावर पदर न घेणं... कोणालाच रुचेना आणि एक दिवस पाटलानं माझ्या लेकीला घरी आणून... माहेरी आणून सोडलं! म्हणाले आम्हाला आमची परंपरा चालवणारी सून पाहिजे. ही सुधारक पद्धतीची, डोक्यावर पदर नाही... नटायला... मॅचिंग लागत... सगळ्यांशी बोलते... तुम्हीच सांभाळा तुमच्या लेकीला आम्हाला जमायचं नाही... म्हणून रंजू माहेरी आली ती कायमचीच! आणि तिच्यावर शिक्का बसला टाकलेली म्हणून! अधून मधून तिकडच्या काही काही बातम्या कुणा ना कुणा कडून कानावर पडतात आणि मग ती बेचैन होते. कुठेच बाहेर जात नाही. घरातच स्वतःला कोंडून घेते.''

''मग मावशी दुसरा तिला समजून घेणारा मुलगा पहा, दुसरं लग्न करुन द्या'' मी म्हणाले. त्यावर मावशी म्हणाल्या, ''बघू आता तिच्या नशीबात काय आहे'' आणि त्या निघून गेल्या. मी सुन्न झाले. रंजू... तिच्या आयुष्यात सुख नव्हते... पण ती दुसऱ्याचं आयुष्य सुगंधित करीत होती. आवडता मोगराही त्यादिवशी मला प्रसन्न करू शकला नाही. त्याचा दरवळही बोचू लागला.

मावशींनी रंजूच्या लग्नाचं खरंच मनावर घेतलं. चांगला होतकरू, शिकलेला मुलगा पाहून तिचं लग्न ठरवलं. मोजक्या नातेवाईकांना आणि हितचिंतकांना बोलावून लग्न लावून दिलं. मुलगा, घरचे लोक चांगले आहेत. रंजू सुखी आहे. खऱ्याखुऱ्या अर्थाने रंजूचं आयुष्य सुगंधित झालं. तीही टवटवीत आणि प्रसन्न वाटू लागली. एक आयुष्य मार्गी लागल्याचं, सुखी झाल्याचं समाधान लाभलं आणि मलाही आता खऱ्या अर्थाने मोगरा फुलला आहे असं वाटून त्याच्या बद्दल जास्तच ओढ वाटू लागली आणि म्हणावस वाटलं...

**मोगरा फुलला फुलला...**

आणि माझ्या मनात मोगरा आता सतत दरवळत राहील.

---

संक्षिप्त



समीर नेर्लेकर
९४२२५०८४७१

# कपडे

शेट मुनीराम आपले आवरुन घराबाहेर पडणार इतक्यात त्याचा गावाकडचा मित्र भोला त्याला भेटायला आला. मुनीराम म्हणाला, ''भोला, तू घरात बसून आराम कर, मी माझ्या काही व्यापारी मित्रांना भेटून येतो.''

भोला म्हणाला, ''नको, मला घरात बसून कंटाळा येईल. त्यापेक्षा मीही तुझ्या बरोबर येतो.''

मुनीरामने भोलाच्या कपड्यांकडे पाहिले, ते जुने होते. तो म्हणाला, ''ठीक आहे, तू चल माझ्याबरोबर, पण त्याआधी हे कपडे बदल. माझे नवीन कपडे मी तुला घालायला देतो.'' भोलाने मुनीरामचे कपडे घातले आणि दोघे घराबाहेर पडले.

मुनीराम भोलाला एका व्यापारी मित्राकडे घेऊन गेला. तिथे त्याची ओळख करुन देताना तो म्हणाला, ''हा आहे माझा जुना मित्र भोला आणि त्याने जे कपडे घातले, ते मात्र माझे आहेत.''



बाहेर आल्यावर भोला मुनीरामला म्हणाला, ''असे का बोललास तू? कपडे तुझे आहेत हे ठीक आहे, पण ते बोलून दाखवण्याची काय गरज होती? आता पुढच्या घरात असे काही बोलू नकोस.''

दोघे दुसऱ्या व्यापाऱ्याकडे गेले. तिथे मुनीराम म्हणाला, ''हा आहे माझा मित्र भोला आणि त्याने जे नवीन कपडे घातले, तेही त्याचेच आहेत.''

बाहेर आल्यावर भोला म्हणाला, ''अरे तू असं का म्हणालास? कपडे माझेच आहेत असं म्हटलं तरी ऐकणाऱ्याच्या मनात संशय निर्माण होतोच ना! तू कपड्यांचा विषयच का काढतोस? आता आपण जिथे जाऊ तिथे कपड्यांचा विषयही काढू नकोस. माझी ओळख नाही करुन दिलीस तरी चालेल, पण कपड्यांचा विषय काढायचा नाही आणि त्याबद्दल काही बोलायचं नाही. लक्षात ठेव!''

दोघे आणखी एका व्यापाऱ्याच्या घरी गेले. तिथे गप्पांच्या ओघात व्यापारीच म्हणाला, ''तुमच्याबरोबर हे सद्गृहस्थ कोण आहेत? कपडे छान आहेत यांचे!''

मुनीराम म्हणाला, ''हा माझा मित्र आहे भोला. राहिला प्रश्न कपड्यांचा, तर ते कुणाचे आहेत, याबद्दल आपण का बोलायचे? कपड्यांचा विषयच नको!''

बाहेर आल्यावर भोला म्हणाला, ''अरे बाबा, हे मला मान्य आहे, की तू तुझे नवीन कपडे मला वापरायला दिलेस, पण ते बोलून दाखवण्याची काय गरज आहे. सारखा-सारखा तू कपड्यांविषयीच का बोलत होतास?''

मुनीराम शांतपणे म्हणाला, ''हे बघ मित्रा, मी एक व्यापारी आहे. व्यापार माझ्या अंगात इतका भिनलाय की मी कोणतीही गोष्ट फुकट करु शकत नाही. इतरांसाठी काहीही केले तरी त्या गोष्टीचे कोणत्याही प्रकारे श्रेय घेणे ही आता माझी सवयच बनली आहे. मी तरी काय करणार!''

**मूळ हिंदी कथा : ओशो**

---

# मायेची माया



लेक सासराला जाता,
येतं डोळ्यांमधी पाणी!
कंठी हुंदके मायेच्या,
बंद होते तिची वाणी!

हात फिरविती तोंडा,
असा मायेचा जिव्हाळा!
कसा देवाने लावला,
माय-लेकिमधी लळा!

तांब्या भरला घेऊनी,
माय बाहेर ती येते!
तिचे सुखलेले डोळे,
उर आपटुनी घेते!

लेक चालत चालत,
जशी दूर दूर जाते!
माय पाहती तोवरी,
तिचा ठिपका न होते!

माय लेकीचं रे नातं,
असं अतूट राहतं,
डोळे होउनिया नदी,
पाणी पळत वाहतं!

**बालाजी भानुदासराव कदम**
रा.सोमठाणा, ता.नायगाव,जि.नांदेड
९१७५७६९३९४

---

## कॉलेज गेट

महाविद्यालयीन भावविश्वाचा वेध घेणारी सागर कळसाईत या तरूण लेखकाची कलाकृती! महाविद्यालयाच्या स्वच्छंदी वातावरणात तरूणाईचे विविध पैलू उलगडत जात असतात. भूतकाळातील आठवणी, भविष्याचा विचार आणि वर्तमानातील मौजमजा यांची सांगड घालताना तरूणाईची घालमेल होते. ही सांगड कशा पद्धतीने घालता येईल याची माहिती देणारी झक्कास कादंबरी. जे कॉलेज गेटच्या आत स्वच्छंदीपणे जीवन जगले, जे जगत आहेत किंवा जे जगतील त्या सर्वांसाठीच... मैत्री की प्रेम? या गुंत्यात अडकलेल्या प्रत्येक तरूणास ही कादंबरी मुक्त करेल! काही सत्य अनुभव आणि काही काल्पनिक प्रसंग यांच्या मैफलीतून 'नाण्याची तिसरी बाजू' असा नवीन विचार मांडला आहे. अगदी हलक्या फुलक्या शब्दांचा आणि भावनांचा शिडकावा असलेली ही कादंबरी वाचकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवते!




**लेखक : सागर कळसाईत**
**पाने : ३२८, मूल्य : २४४**

या पुस्तकासाठी संपर्क : ०२० २४४६०९०९, ७०५७२९२०९२



# आवड

शब्दतरंग

सदानंद भणगे, नगर
९८९०६२५८८०



*कोण*, कधी, कुणाला कसा आवडेल काहीच सांगता येत नाही आणि कोण कधी कुणाला कसा आवडून गेला असेल हे त्याहीपेक्षा अवघड आहे. अहो गाढवाचं पिल्लूदेखील छान दिसतं ते आपल्याला आवडतं... पण ठराविक वयात माणसाची आवड काय असेल काहीच सांगता येत नाही.

खाण्याच्या बाबतीत माणसाची आवड तर विचारायलाच नको. अगदी अन्नापासून प्राणी, पक्षी एवढंच काय माणसाला पैसे खाणंसुद्धा आवडतं. खाण्याच्या आवडीपायी कितीतरी प्राणी बळी पडतायत. बकरीपासून ससापर्यंत... कोंबडीपासून झुरळापर्यंत... एवढंच काय काही लोकांना म्हणे बांबू खूपच आवडतात. बांबूची भाजी ते शेवग्याच्या शेंगाच्या भाजीसारखी खातात...

पिण्याच्या बाबतीतही विचारायलाच नको. फार आवडीने माणूस प्यायला लागला तर तो आडवा होतो... पितानाही पाण्यापासून थंडपेयापर्यंत आणि दारुपासून विषापर्यंत माणूस सगळं आवडीने पितो (आत्महत्या करायच्यावेळी तो विष देखील आवडीनेच पीत असेल ना? अनुभव्यालाच विचारायला हवं)

कलेची आवड असणारा माणूस मात्र खरोखरीच भाग्यवान. एखाद्याला चित्र काढायला आवडते. एखाद्याला वाचनाचीच आवड असते. कुणाला नृत्याची आवड असते तर कुणाला नाटकात काम करण्याचीच आवड असते. अशी माणसे आपल्या आवडीचे छंद जोपासण्यात मग्न असतात. खूप छान जगतात ही मंडळी. दुसऱ्याचं उणं दुणं काढून, दुसऱ्याच्या आनंदात मिठाचा खडा टाकण्याऐवजी, दोन मित्रांच्या मैत्रीत विष पेरण्याऐवजी कलेमध्ये स्वतःला झोकून देणं चांगलंच. स्वतःची उन्नती आणि दुसऱ्याचंही नुकसान नको; पण त्यासाठी माणूस मनात कलावंत हवा, खलनायक नको. काही लोकांना निसर्गरम्य ठिकाणी भटकण्याची आवड असते. काही लोकांना किल्ले, ऐतिहासिक ठिकाणी जाण्याची आवड असते. त्यांना घरात चैन पडत नाही, तर काही जणांना घरात बसायचीच आवड असते. काही लोक कलावंत नसले तरी दुसऱ्याला दाद देणे त्यांना आवडते. चांगल्या गाण्याला ते दाद देतात. चांगल्या नाटकाचं कौतुक करतात. चांगल्या कलाकृतींच्या प्रदर्शनाला भेट देतात. अशी माणसं जीवनाचा आनंद लुटतात.

काही लोकांना राजकारणाची आवड असते, तर काहींना विध्वंस करायची आवड असते. काहींना दुष्टपणा करायची, माणसं तोडायची हौस असते. काहींना विघ्नसंतोषीपणा करायची आवड असते, कुणाला दुसऱ्याचं कौतुक करायची आवड असते तर कुणाला दुसऱ्याची निंदा करण्याची आवड असते. निंदा करणं वाईटच पण अतिशयोक्तीपूर्ण कौतुक करणं त्याहीपेक्षा वाईट.

माणूस हा संस्कारक्षम प्राणी आहे. चरितार्थासाठी कष्टार्जन करावं आणि उरलेला वेळ करमणुकीत घालवावा हे त्याला आवडतं. ह्या करमणुकीच्या वेळात तो आपली आवड जोपासतो. कुणी बागकाम करतो, कुणी घरातली आवराआवर करतो. कुणी सिनेमा नाटकांना जातो. मग अशा समान आवडीच्या व्यक्ती एकत्र येतात. त्यांची संघटना बनते मग ते सामुहिक कार्य सुरु करतात. बहुतांश लोक विधायक कार्याकडे वळतात. जेणेकरून स्वतःचा वेळ जाईल आणि समाजाची उन्नती होईल याकडे सुशिक्षित समाज लक्ष देतो. ज्यांच्यावर संस्कारच झालेले नसतात असे माझ्या दृष्टीने अशिक्षित तेच केवळ विध्वंसक कार्याकडे वळतात. कुणाच्या वाईटासाठीही धडपडतात.

चांगली आवड जोपासणे ही सुसंस्कृत माणसाची लक्षणे असतात. ज्या राष्ट्राची कला श्रेष्ठ, त्या राज्याची संस्कृती श्रेष्ठ. त्या राज्याची प्रगती होते. आपणच आपल्या प्रत्येक क्षणाचा उपयोग काहीतरी चांगलं करण्यासाठी केला तर निश्चितच स्वतः बरोबर समाजाची उन्नती होऊ शकेल.

---

# देशद्रोही घोषणा आणि राजकीय सापळा



*जित्याची* खोड म्हणतात तशी हल्ली डाव्यांची मती चालेनाशी झाली आहे. अन्यथा पुरोगाम्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या भानगडीत आत्महत्येचा पवित्रा कशाला घेतला असता? ९ फेब्रुवारी २०१३ रोजी अफजल गुरूला दहशतवादी म्हणून फाशीची शिक्षा देण्यात आली. म्हणजे त्या दिवशी त्याची अंमलबजावणी झाली. त्याचे निमित्त धरून काही डाव्यांनी नेहरू विद्यापीठात 'पुण्यतिथी' साजरी करण्याचा घाट घातला. त्यात अफजलचा जयजयकार झाला, हे स्वाभाविक आहे; पण तिथे भारतविरोधी घोषणा देण्यात आल्यावर त्याला राष्ट्रद्रोहाचे लेबल लागले आणि अन्यथा भाजपापासून फटकून रहाणाऱ्या काही माध्यमांना डाव्या भूमिकेवर देशद्रोहाचा आरोप करावा लागला. खरे तर त्यापासून सावधपणे पुरोगाम्यांनी आपले अंग काढून घ्यायला हवे होते. पण संघद्वेष आणि मुस्लिमांचे लांगुलचालन करण्याची सवय इतकी अंगवळणी पडली आहे, की रचलेल्या सापळ्यात पुरोगामी अर्धवटराव आयतेच उड्या मारत गेले. बारकाईने हा घटनाक्रम बघितला, तर त्यातला सापळा स्पष्ट होतो. त्या घटनेनंतर प्रथम तिथे भारतविरोधी घोषणा दिल्याचा गवगवा सोशल माध्यमातून झाला. तो व्हिडिओ इतका सार्वत्रिक झाला, की मुख्यप्रवाहातील माध्यमांना त्याची दखल घ्यावीच लागली. तेव्हा हे चित्रण अस्पष्ट वा धुरकट होते आणि त्यातून फारसे काही स्पष्ट कळत नव्हते. साहजिकच त्याविषयी शंका घ्यायला जागा होती. त्याचाच फायदा पुरोगामी उचलणार, हे काही लोकांना नेमके ठाऊक असावे. किंबहुना पुरावे फारसे भक्कम सज्जड नाहीत, अशा भ्रमात डाव्यांना फसवण्याचा त्यामागे डाव असू शकतो. झालेही तसेच! कारण त्या किरकोळ चित्रणाचा आधार घेऊन काहुर माजले आणि राजकारण रंगू लागल्यावर, त्यात पोलिसांना हस्तक्षेप करावाच लागला. ते घडल्यावर आपल्या 'पोरांसाठी' तमाम पुरोगामी रस्त्यावर येणार याची 'चित्रण' प्रदर्शित करणाऱ्याला खात्री असावी. म्हणूनच संपूर्ण चित्रण वा पुरावे सादर करायचे टाळून लावलेला, हा एक सापळा असावा अशी शंका घ्यायला जागा आहे. ज्या सापळ्यात डावे फसले की, मगच जाळे ओढायचा खरा डाव असावा.

विद्यार्थी संघटनेच्या म्होरक्याला अटक झाल्यावर अपेक्षेप्रमाणे तमाम पुरोगाम्यांनी त्यावर आधाश्यासारखी झडप घातली. मोदी सरकार विरोधात असहिष्णुतेचा खजिनाच हाती लागला, म्हणून उतावळेपणाने त्या किरकोळ चित्रणावर शंका घेतल्या गेल्या आणि देशद्रोही घोषणांचेही समर्थन करण्यापर्यंत मजल मारली गेली. त्यातून पुरोगामी देशद्रोही व भारतविरोधी भूमिकेलाही पाठबळ देऊ शकतील, असेच चित्र रंगवायचे असावे. सगळेच चित्रण व पुरावे ठामपणे देशविरोधी असल्याचे आधीच स्पष्ट झाले असते, तर पुरोगामी नेत्यांनी व पक्षांनी त्याचा पाठपुरावा नक्कीच केला नसता; पण शंकास्पद पुरावे असल्यानेच त्यांनी पाठिंब्याचा जुगार खेळायचा धोका पत्करला. तो पत्करला आणि त्यासाठी थेट राहुल गांधींपासून अनेक पुरोगामी नेत्यांनी विद्यापीठात हजेरी लावल्यानंतर त्यांना माघार घेण्यास जागा राहिलेली नव्हती. म्हणून रविवारपर्यंत खरे व भक्कम पुरावे झाकून ठेवण्यात आलेले होते काय? ठामपणे पुरोगामी नेत्यांनी अटकेतील विद्यार्थ्यांचे समर्थन केल्यावर सोमवारी धडाधड अनेक चित्रणे समोर आणली गेली. ज्यामध्ये शेकड्यांचा जमाव स्पष्ट आवाजात भारतविरोधी देशद्रोही घोषणा देत असल्याचे स्पष्ट दिसते आहे. मुद्दा इतकाच की, हे बाकीचे विस्तृत चित्रण पहिल्यापासून समोर का आणले गेले नाही? ते आले असते, तर पुरोगामी नेत्यांनी या भानगडीपासून स्वतःला सावधपणे चार हात दूर ठेवले असते. भले अटक झालेल्यांविषयी सहानुभूती दाखवली असती; पण मैदानात उतरून समर्थन नक्कीच केले नसते. घडले त्या पापाचे तात्विक समर्थन करायचा मूर्खपणा तरी केला नसला; पण त्यांची दिशाभूल होईल आणि ते देशद्रोही घोषणांच्या समर्थनाला येतील, यासाठी अर्धवट चित्रणाचा सापळा कोणीतरी लावलेला होता. मात्र गृह मंत्रालयाकडे हे संपूर्ण चित्रण प्रथमपासून नक्की असावे. म्हणूनच त्याच्या आधारे धरपकड झाली. अधिक राजनाथ सिंग यांनी भक्कम पुरावे असल्याची भाषा केलेली होती. म्हणूनच त्या अटकेला कोर्टाकडून प्रतिसाद मिळू शकला. मुद्दा असा की, यातून कोणता राजकीय डाव साधला गेला किंवा योजला गेला आहे?

आपली स्मरणशक्ती दुबळी नसेल, तर काही आठवणी जागवणे योग्य ठरेल. गेल्या आठ दिवसात हजारो वेळा त्या चित्रणाचे बहुतांश वाहिन्यांवरून प्रक्षेपण झाले आहे आणि अजूनही होतेच आहे. त्या चित्रातून व त्यासोबतच्या शब्दातून जनमानसावर एक गडद ठसा उमटत असतो. अशा घोषणा देण्याने देशद्रोहाचा गुन्हा सिद्ध होतो किंवा नाही, हा विषय राजकारणात दुय्यम असतो. त्यापेक्षा त्यातून जनतेच्या मनावर कोणता प्रभाव पडत असतो, त्याला मोठे महत्त्व असते. चार वर्षांपूर्वी असेच एक चित्रण वाहिन्यांवरील बातम्यांचे आकर्षण झाले होते. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांनी सद्भावना यात्रा केलेली होती, त्यानिमित्त हजारो लोकांनी त्यांची व्यक्तीशः भेट घेतली. त्यात मुस्लिमही होते. अशाच एका समारंभात एक मुस्लिम मौलवी मोदींना टोपी देतानाचा प्रसंग आला. त्याला तिथेच रोखून नुसत्या हावभावातून आपल्याला ती मुस्लिम टोपी नको असल्याचे मोदींनी सूचित केलेले होते. त्यात कुठला आवाज नव्हता, की शब्द नव्हते; पण मुस्लिमाने दिलेली टोपी नाकारून मोदींनी इस्लामचा अवमान केल्याचा कल्लोळ काही दिवस चालू राहिला. त्यानंतरही अनेकदा तेच चित्रण वारंवार दाखवले जात होते. त्यातून मोदींची मुस्लिमविरोधी प्रतिमा रंगवण्यासाठी माध्यमांनी, वाहिन्यांनी व राजकारण्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. अर्थात त्यामागे पंतप्रधान पदाच्या शर्यतीतून मोदी बाद व्हावेत, हाच हेतू होता. मात्र परिणाम उलटाच होत गेला. त्याच सततच्या प्रक्षेपणातून हिंदुत्वाचा कट्टर अभिमानी, मुस्लिमांचे धार्मिक लाड न करणारा नेता अशी प्रतिमा जनमानसात उभी करण्याचे महान कार्य त्यातून पार पडले. म्हणजे जे काम मोदी विरोधासाठी झाले, त्यातूनच त्यांची भारतभर एक कणखर हिंदू नेता अशी प्रतिमा उभी राहिली. त्याचा राजकीय लाभ २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी व भाजपाला झाला. आताही भारतविरोधी घोषणांचा जो रतिब गेले आठवडाभर घातला जात आहे आणि आणखी काही दिवस घातला जाईल, त्यातून कोणता प्रभाव जनमतावर पडणार आहे? पुरोगामी म्हणजे भारतविरोधी, देशद्रोही अशी मोदी विरोधकांची प्रतिमा यातून उभी रहाण्यास हातभार लागला आहे की नाही? आपल्याच मनाशी हा प्रश्न विचारून बघा. उत्तर सोपे आहे. म्हणूनच हा एक सुनियोजित डाव वाटतो.

हा विषय पुढले काही दिवस चर्चेत राहणार आहे. त्यात सतत नेहरू विद्यापीठातल्या त्या देशद्रोही घोषणा दाखवल्या जातील. त्याचा बचाव करण्याखेरीज डाव्या पुरोगामी राजकारण्यांना पर्याय नाही. कारण माघार घेतली तर आधी मूर्खपणा केलेला दिसेल. म्हणून आधीच्या उतावळेपणाचा पाठपुरावा करावाच लागेल. तो करताना देशद्रोही हे मत अधिक घट्ट होत जाईल. कारण सहा दिवसानंतर समोर आलेले चित्रण अधिक स्पष्ट आहे आणि त्यातून त्या समारंभातील भारताच्या विरोधातली घातपाती भूमिका लपून रहात नाहीत. त्यामुळे संबंधितांना शिक्षापात्र ठरवणे शक्य असो किंवा नसो, त्याचा मतांवर परिणाम होत नाही. उद्या भले अटकेतील विद्यार्थी कायदेशीर पुराव्याअभावी निर्दोष मुक्त होतील; पण जनतेच्या कोर्टामध्ये पुरोगामी म्हणजे देशद्रोही, अशी प्रतिमा उभी करण्याचा डाव यशस्वी झाला आहे. म्हणूनच आरंभी किरकोळ अस्पष्ट चित्रण आणले जाणे आणि काही दिवसांनी अधिकाधिक विस्तृत चित्रण समोर आणले जाणे, हा पुरोगाम्यांना सापळ्यात ओढण्याचा डाव वाटतो; पण पुण्याच्या फिल्म संस्थेतील संपापासून, हैद्राबादच्या रोहित आत्महत्येपर्यंत आणि साहित्य अकादमीच्या पुरस्कार वापसीपासून विविध असहिष्णुतेच्या आरोपापर्यंत पुरोगाम्यांनी उठवलेले रान इतके प्रभावी प्रचाराचे ठरले होते की, त्यात ही मंडळी कमालीची शेफारून गेलेली होती. तशा अवस्थेत विवेकाचा तोल सुटतो आणि तारतम्याचे भान उरत नाही, लागोपाठ चौकार षटकार मारताना फलंदाजाने बेभान व्हावे, तशी स्थिती येते. नेहरू विद्यापीठातल्या घटनेने त्याचीच प्रचिती आलेली आहे. पुरोगाम्यांसाठी लावलेल्या राजकीय सापळ्यात ते आयते अडकले आहेत आणि म्हणून नंतर पुढे आणले गेलेले चित्रण हे योगायोग नसून, त्यामागे एक राजकीय योजना असल्याचा संशय येतो. पुरोगामी म्हणजे हिंदुत्वविरोधीच नव्हेत, तर भारतविरोधी होत, असे जनमानस घडवण्याचा तो डाव असू शकतो. कोळ्याच्या जाळ्यात फसलेला कीटक जसा सुटण्याची धडपड करताना त्यात अधिकच फसत गुरफटत जातो, तसे या जाळ्यात पुरोगामी फसले आहेत आणि गुरफटत गेले आहेत. सुटायला धडपडतील तितके अधिक गुंतत जात आहेत.

■ भाऊ तोरसेकर

भ्रमणध्वनी : ९७०२१३४६२४

# प्रेमरंग कविसंमेलन उत्साहात




**पुणे, (प्रतिनिधी) :**
रंगत-संगत व लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी साहित्य परिषदेच्या सभागृहात प्रेमरंग हे कविसंमेलन संपन्न झाले. त्याला रसिकांनी, कविप्रेमींनी अलोट गर्दी केली होती व त्या संमेलनाला भरभरून दाद दिली. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गझलकार रमण रणदिवे उपस्थित होते. व्यासपीठावर रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, लोकमंगल ग्रुपचे अध्यक्ष शिरीष चिटणीस व प्रभा सोनवणे उपस्थित होते. रमण रणदिवेंनी आपल्या गझलेनी 'प्रेमरंग'ची सुरूवात केली. या संमेलनात मनीषा दीक्षित, स्वप्निल पोरे, सुजीत कदम, मोनिका जोशी, अंजली कुलकर्णी, टिकम शेखावत आदी कविंनी सहभाग घेतला.

अनिल दीक्षित यांच्या 'तुझ्यामुळे आयुष्याचा सुंदर प्रवास' या गेय रचनेला विशेष दाद मिळाली. राजीव बर्वे ह्यांच्या 'व्हॅलेंटाईन डे' ह्या कवितेला, मन्मथ बेलूरे व भालचंद्र कोळपकर ह्यांच्या 'बायकोवरच्या कविते'ला व बंडा जोशी यांच्या विडंबन गीताला विशेष प्रतिसाद मिळाला. आपल्या भाषणात रमण रणदिवे म्हणाले की, ''कविता ही रक्तावर आलेली भावनांची साय असते. ज्या कवींना माणसांची नस पकडता येते तोच कवी यशस्वी होतो.'' कविसंमेलनाचे सूत्रसंचालन ॲड. प्रमोद आडकर यांनी केले व शिरीष चिटणीस यांनी आभार मानले.

# ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान




**लोणी काळभोर, (वार्ताहर) :**
पंधरा नंबर (हडपसर) येथील जनकल्याण प्रतिष्ठानचे संस्थापक दिलीप शंकर तुपे हे आपल्या प्रतिष्ठानमार्फत दर महिन्याला ज्येष्ठ नागरिक कट्टा भरवतात. या निमित्ताने उज्वला कुलकर्णी यांचा एकपात्री 'हास्यरंजन' हा विनोदी कार्यक्रम आयोजित केला होता.

याबाबत दिलीप तुपे यांनी सांगितले की, आमच्या प्रतिष्ठानच्या वतीने अनेक उपक्रम राबविले जातात. समाजातील सर्व जाती धर्मांना व सर्व वयोगटातील नागरिकांना एकत्र घेऊन विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ज्येष्ठ नागरिकांना समाजात मानाचे स्थान राहिले पाहिजे म्हणून आम्ही दर महिन्याला ज्यांचे वाढदिवस असतात त्यांचे वाढदिवस साजरे करतो. त्यांची कुठल्याही प्रकारची हेळसांड होऊ नये म्हणून आम्ही सर्व कार्यकर्ते जागरूक असतो. या महिन्यात आम्ही ज्येष्ठ नागरिकांना प्रतिष्ठानच्या वतीने नटसम्राट हा चित्रपट सिनेमागृहात नेऊन दाखविला.

यावेळी २०० ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. यावेळी दिलीप तुपे व विजू सोनार यांनी ज्येष्ठ नागरिकांचे आभार मानले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अनिल सोनवणे, प्रितम पवार, अंकुश साळुंखे,महंमद शेख, सोनू ढोणे, हर्षद शेख, दिनेश घरफोडे, सुरेश सोनार, गणेश विघने उपस्थित होते.

# आजच्या पिढीने संस्कार विसरू नये

**लोणी काळभोर, (वार्ताहर) :**
आजची पिढी नवीन कास धरता धरता जुणे संस्कार विसरत चाललेली आहे, असे प्रतिपादन युवा व्याख्याते सचिन माथेफोड यांनी केले. समाजभूषण गणपतराव काळभोर (मामा) यांच्या पुण्यतिथी निमित्त समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय (लोणी काळभोर) येथे आजची युवापिढी या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजीत केले होते.

यावेळी माथेफोड म्हणाले, पूर्वी आईवडील, गुरू आणि अतिथी यांना आपण परमेश्वर मानले जायचे पण त्याच आईवडिलांना आज वृद्धाश्रम दाखविला जातो. गुरूचा तर किती सन्मान होतो हे माहितीच आहे आणि अतिथी तर नकोच. शिवाजी महाराजांचा आदर्श घेतला पाहिजे. त्यांच्या नावातील शि-शिका, वा-वागा आणि जी-जिंका ही शिकवण तरूणांनी आयुष्यभर ध्यानात घेतली पाहिजे. स्पर्धा परिक्षेत उतरून यश संपादन करून आपले, शाळेचे व गावाचे नाव देशात उज्वल केले पाहिजे. यावेळी सरपंच सौ. वंदनाताई काळभोर, उपसरपंच योगेश काळभोर, प्राचार्य सुळगेकर उपस्थित होते.

# एकाच कुटुंबातील सहा पुस्तकांचे प्रकाशन




**पुणे, (प्रतिनिधी) :**
लातूर येथील प्रतिथयश विवेकानंद रूग्णालयाचे शिल्पकार डॉ. अशोक कुकडे यांचे विवेकानंद रूग्णालयाच्या यशाची गाथा सांगणारे 'कथा एका ध्येयसाधनेची' ज्याला डॉ. अभय बंग यांची प्रस्तावना लाभलेली आहे, त्या गाजलेल्या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीच्या निमित्ताने त्यांच्या कुटुंबातील आणखी पाच पुस्तके मिळून सहा पुस्तकांचे प्रकाशन रविवार दि. २८ फेब्रुवारी २०१६ रोजी कुलगुरू, डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबई माजी अधिष्ठाता (डीन) के. ई. एम. व सायन हॉस्पिटल, मुंबई डॉ. संजय ओक यांच्या शुभहस्ते आणि सुप्रसिद्ध गप्पाष्टककार आणि प्रवचनकार डॉ. संजय उपाध्ये यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. एकूण सहा पुस्तकांमध्ये 'कथा एका ध्येयसाधनेची' (चौथी आवृत्ती), 'पॅशन टू मिशन' (इंग्रजी प्रथम आवृत्ती), डॉ. अशोक कुकडे यांच्या पत्नी डॉ. ज्योत्स्ना कुकडे यांचे विविध विषयावर भाष्य करणारे 'बोल अंतरीचे' तसेच डॉ. कुकडे यांची मुलगी डॉ. अनघा लवळेकर यांची महिला मानसशास्त्र आधारित 'आजचे पसायदान', 'स्त्री मनाचा कानोसा', 'रंग नात्यांचे' अशी मिळून ६ पुस्तके एकाच वेळी प्रकाशित होण्याचा वेगळाच योग आलेला आहे. एकाच वेळी एकाच कुटुंबातील सहा पुस्तकांचे प्रकाशन होण्याचा बहुधा हा पहिलाच प्रसंग असावा.

या कार्यक्रमाचा लाभ साहित्यप्रेमींनी घ्यावा असे आवाहन स्नेहलचे श्री. रवींद्र घाटपांडे यांनी केलेले आहे. हा कार्यक्रम आबासाहेब गरवारे कॉलेज असेंब्ली हॉल, कर्वे रोड, डेक्कन जिमखाना, पुणे-४ येथे २८ फेब्रुवारी सायंकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे.

# महिलांसाठी स्वतंत्र व्यासपीठ उभारणार : पल्लवी सुरसे



**लोणी काळभोर, (वार्ताहर) :**
महिलांच्या समस्या आजही बऱ्याच प्रमाणात तशाच आहेत. त्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उभारणार आहे, असे प्रतिपादन जिल्हा अन्नधान्य वितरण व्यवस्था व दक्षता समितीच्या सदस्या पल्लवी प्रशांत सुरसे यांनी केले. सातववाडी, गोंधळेनगर (हडपसर) येथे आयोजीत केलेल्या हळदी-कुंकू समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी मराठी सिने अभिनेत्री स्नेहल तरडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

आपला परिसर आजही म्हणावा असा विकसीत झालेला नाही. महिलांच्या समस्या आजही त्याच आहेत. कोणावर टीका करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करण्यावर आपला भर राहणार असून महिलांना संघटित करून त्यांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य देणार आहे. तसेच त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उभारणार आहे, असेही पल्लवी सुरसे म्हणाल्या.

महिलांचा प्रचंड प्रतिसाद पाहून मी भारावून गेले आहे. प्रत्येक क्षेत्रात महिलांना मोठी संधी प्राप्त होत आहे. ती शोधणे व त्यासाठी प्रयत्न करणे हे आपले काम आहे. आत्मविश्वास असल्यास काहीही शक्य आहे, असे उद्गार सिने अभिनेत्री स्नेहल तरडे यांनी काढले. या कार्यक्रमाला हजारो महिलांनी उपस्थिती दाखवून पल्लवी सुरसे या चांगले काम करत असल्याचे सांगितले.

यावेळी प्रशांत सुरसे, नंदकुमार अजोतीकर, ओमप्रकाश झंवर, मनोहर होडे, अंकुश साळुंखे, नलीनी झंवर, लता झंवर, चेतना कळगट, सुजाता पोमण, मोना ख्याडे, वासंती कांबळे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन युवक प्रतिष्ठान ट्रस्ट, महिला बचत गट यांनी केले. सूत्रसंचालन अर्चना कांबळे यांनी केले तर आभार ओमप्रकाश झंवर यांनी मानले.

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था पुणे केंद्र**

**महिला दिन विशेष**

दि. १२ मार्च २०१६ शनिवार सकाळी ८ ते रात्रौ ८ पर्यंत

**स्थळ : गुप्ते मंगल कार्यालय, केसरीवाड्यासमोर, पुणे**

* उद्योजक महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी महिला उद्योजक मेळावा प्रॉडक्ट विक्रीसाठी स्टॉल देणे आहेत (मर्यादित संख्या) माफक दर.
* वय वर्षे १८ व पुढील युवती व महिलांसाठी **फॅन्सी ड्रेस स्पर्धा : भरपूर बक्षिसे**

**अधिक माहितीसाठी :**
संस्था कार्यालय
१२९३, सदाशिव पेठ, कौशिक सोसायटी, चिमण्या गणपती जवळ, पुणे ३०
**संपर्क : सौ. सुजाता मवाळ - ९७६७५८८२२३**
**सौ. शैला गिजरे - ९४२२३६९३०५**

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी नेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्लांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय : 'चपराक', ६१७, 'साईकृपा', पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२ Email : info@chaprak.com